
Mahalaxmi.org.in



सरस्वती पब्लिशिंग कंपनी प्रा.लि.
१२१७/२, ए वॉर्ड, शिवाजी पेठ,
कोल्हापूर. फोन : ०२३१-२५३०३२५

मुंबई, पुणे व कोंकण आवृत्ती

# श्रीवासुदेवानंदसरस्वती टेंबेस्वामी



कोकण प्रांती सावंतवाडी संस्थान सरहद्दीनजीक माणगाव नावाच्या एका खेडेगावात हरिभट टेंबे नामक एक सच्छिल ब्राह्मण राहत होते. तेच महाराजांचे आजोबा होत. ते एक अग्निहोत्री कऱ्हाडे जातीचे ब्राह्मण गृहस्थ होते. गावातील ब्राह्मणांच्या निर्वाहाचे साधन म्हणजे भिक्षुकवृत्ती हेच होते. म्हणजेच भिक्षुकी होय. हरिभट टेंबे हे दत्तोपासक होते. त्यांचे ज्येष्ठ चिरंजीव गणेशपंत टेंबे. त्यांच्या पत्नीचे नाव रमाबाई होते. गणेशपंत हे मूळचेच विरक्त वृत्तीचे होते. वडिलांच्या दत्तभक्तीचा वारसा गणेशपंतांनी उचलला होता. ते दररोज श्रीदत्त पादुकांची पूजा व श्रीगुरुचरित्राचे वाचन करीत असत. दत्तोपासना करीत असता वैराग्य उत्पन्न होऊन त्यांनी संन्यास घेण्याचा विचार केला. त्या वेळी त्यांना दृष्टांत होऊन प्रथम घरी जाऊन गृहस्थाश्रम पुरा करण्याबद्दल श्रीदत्तात्रेयांची आज्ञा झाली. त्याप्रमाणे ते पुन्हा घरी आले. यथावकाश त्यांच्या उपासनेवर संतुष्ट होऊन स्वतः श्रीदत्त गर्भरूपाने त्यांच्या पत्नी रमाबाईंच्या पोटी शके १७७६, श्रावण वद्य पंचमीस म्हणजेच रविवार, दिनांक १३ ऑगस्ट १८५४ रोजी अवतीर्ण झाले, असे म्हणतात.

हे उभयतां पती-पत्नी श्रीदत्तोपासक होते. त्यांच्या पोटी जो पुत्र जन्माला आला तो म्हणजेच वासुदेव गणेश टेंबे ऊर्फ वासुदेवानंदसरस्वती तथा टेंबेस्वामी होत. 'शुध्दबीजापोटीं। फळे रसाळ गोमटीं।।' या संत तुकारामांच्या उक्तीप्रमाणे गणेशपंत आणि रमाबाई यांसारख्या भाविक उपासकांच्या पोटी वासुदेवांसारखे रत्न निपजणे हे स्वाभाविकच होय.

श्री वासुदेवानंदांचे बालपणीचे नाव वासुदेव होते. वासुदेव पाच वर्षांचा झाल्यावर त्यांचे पितामह हरिभट यांनी त्यांच्या शिक्षणास प्रारंभ केला. वडिलोपार्जित दत्तभक्तीचा वारसा श्री वासुदेवशास्त्री बुवांकडे आला होता. त्यांची बुध्दी लहानपणापासूनच तीव्र होती. ते एकपाठी होते. वयाच्या आठव्या वर्षी व्रतबंध संस्कार होऊन बाराव्या वर्षीच त्यांचे ऋग्वेद-संहितादिकांचे अध्ययन झाले. प्रगल्भ बुध्दिमत्ता आणि तेजस्वी वाणीच्या जोरावर वेद मुखोद्गत करून सर्व शास्त्रांचे अध्ययन केल्याने ते दशग्रंथी ब्राह्मण म्हणून नावारूपास आले.

अग्निकार्य, नित्य गुरुचरित्र वाचन, भिक्षा या नित्य आन्हिकांबरोबरच त्यांनी वेदाध्ययन, याज्ञिक, संस्कृत, ज्योतिषशास्त्र तसेच अष्टांग योगाभ्यास सुरू केला. अध्ययनाच्या वेळी ते नेहमी सोवळ्यात राहत असत. लहान वयातच ते मंत्रप्रयोगाचे चमत्कार करू लागले होते. परोपकार बुध्दी, अतिथींबद्दल पूज्यभाव इत्यादी सद्गुण त्यांच्या अंगी लहानपणापासूनच वसत होते.

शके १७९७ साली अर्थात त्यांच्या वयाच्या २१ व्या वर्षी त्यांचा विवाह सावंतवाडीचे बाबाजीपंत गोडे यांच्या कन्येबरोबर झाला. त्यांच्या पत्नीचे नाव अन्नपूर्णाबाई होते. अन्नपूर्णाबाई स्वभावाने अत्यंत सुशील होत्या. त्यांनी एकनिष्ठपणे आपल्या पतीची सेवा केली. पत्नीच्या विनंतीवरून वासुदेवानंदांनी तिला स्त्रीधर्माचा उपदेश केला होता. स्त्रीधर्म सांगण्याच्या मिषाने त्यांनी साऱ्या नित्यनैमित्तिक आचारधर्मावर व्याख्यान केले आहे, असे म्हणण्यास हरकत नाही. अन्नपूर्णाबाई यांचा अधिकारही फार मोठा होता. त्या जश्या सुशील होत्या, तश्याच त्या वैराग्यशीलही होत्या. त्यांचा आध्यात्मिक दर्जाही फार श्रेष्ठ दर्जाचा होता. कोणतेही शिक्षण, पूर्वाभ्यास नसतानाही त्यांची समाधी लागत असे. शास्त्रीबुवांना पुढे एक मुलगाही झाला, पण लवकरच तो कालवश झाला. यावेळीही पत्नीस जो पुत्रशोक झाला, तो दूर करण्याकरिता त्यांनी उपदेश केला होता, तो देखील वाचनीय आहे.

१८९१ मध्ये अन्नपूर्णाबाईंचे निधन झाले. पत्नीच्या मृत्यूनंतर १३ व्या दिवशी प्रापंचिक असले तरी मुळात संन्यस्त वृत्ती असणाऱ्या शास्त्रीबुवांनी दत्तात्रेयांच्या आज्ञेनुसार उज्जयिनीच्या नारायणानंद सरस्वतींकडून विधिपूर्वक संन्यासदीक्षा घेतली व वासुदेवानंदसरस्वती या नावाचा स्वीकार केला. मूळच्या वासुदेवाचे वासुदेवभटजी झाले. पुढे वासुदेवशास्त्री झाले आणि अखेर वासुदेवानंदसरस्वती या नावाने त्यांची अक्षय्य कीर्ती राहिली. ह्या स्थित्यंतराचे मूळ कारण त्यांच्या अंतरातील विरक्ती होय.

धर्मशास्त्राचे सहज नियम ते काटेकोरपणे पाळत असत. दत्तोपासना या विषयावर संस्कृत, मराठी रचना करणारे ते कवी व लेखक होत. वासुदेवानंदसरस्वतींना दत्तसंप्रदायात श्रीदत्तात्रेयांचा अवतार मानले जाते. अनुभूती व अनुभवातून प्राप्त झालेले ज्ञान ते उपदेशरूपाने आपल्या साधकांना देत असत. 'निसर्गाकडे चला', असा संदेश त्यांच्या लेखनातून अनुभवाला येतो. त्यांचे जीवन म्हणजे एक अद्भुत, विलक्षण अवतारी पुरुषाचे आदर्शपूर्ण चैतन्यमय चरित्र आहे. एकात्म आध्यात्मिक भारतीय राष्ट्रवादाचे प्रतीक म्हणजे स्वामी महाराजांचे व्यक्तिमत्त्व, वाङ्मय आणि जीवनदृष्टी होय. स्वामींनी संपूर्ण भारतात पायी अनवाणी भ्रमण केले. 'अष्टौ ग्रासा मुनेर्भक्ष्या:' या वचनास साजेल असाच महाराजांचा नित्य आहार असे. तिखट, गोड वगैरे तर वर्ज्यच होते. व्रतोपवासामुळे त्यांचे शरीर व मन अत्यंत निर्मळ झाले होते. यामुळे योगाच्या अंतरंगात त्यांना सहजप्रवेश होऊन त्यांना सर्वज्ञता लाभली होती. माणगावात ते विद्वान व शास्त्रज्ञ म्हणून गणले जाऊ लागले. ईश्वरी प्रेरणेने काव्यस्फूर्ती झाली व संस्कृत अध्ययन अगदी बेताचेच असताही श्रीदत्त प्रेरणेने सर्वांना उपयोगी पडावे म्हणून त्यांनी गुरुचरित्राचे संस्कृतमध्ये रूपांतर केले. तसेच अनेक ग्रंथांपैकी 'चित्सद्बोधनक्षत्रमाला' व 'आत्मानात्मविचार' हे प्राकृत ग्रंथ देखील तयार केले.

श्रीस्वामींच्या लोकोत्तर सामर्थ्याविषयी सर्व लोकांना खात्री होती. 'वज्रादपि कठोराणि' असे अपराध्याविषयी प्रभूंचे चित्त आहे. लोकाग्रहास्तव गंगालहरीप्रमाणे ५१ श्लोकांनी कृष्णालहरी केली. हे श्लोक रचण्याचे वेळी प्रत्यक्ष भगवती कृष्णामाता पुढे येऊन उभी राहत होती. ५१ श्लोकांची ही रचना झाल्यावर पुरे असे सांगून भगवती कृष्णामाता अंतर्धान पावली होती.

महाराज अनेक चमत्कार करून दाखवित असत. त्यासंबंधी कित्येक गोष्टी प्रसिध्द आहेत. वेळोवेळी महाराजांनी अमुक रितीने वागावे, अशी श्रीदत्तात्रेयांची आज्ञा होत असे व त्याप्रमाणे वर्तन न घडल्यास त्यांनाही प्रायश्चित्त भोगावे लागत असे.

भारतभर पायी अनवाणी संचार करून त्यांनी श्रीदत्तात्रेयांचा आदेश शिरोधार्य मानून तेवीस चातुर्मास केले. महाराष्ट्र, उत्तर भारत आणि गुजरात प्रांतात त्यांचा विशेष संचार होता. अनेक प्रतिकूल प्रसंग येऊनही लोकोध्दाराच्या कार्यापासून आणि सद्गुरू निष्ठेपासून ते तसूभरही ढळले नाहीत. त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन लोककल्याणासाठी तसेच दत्तभक्तीचा प्रचार करण्यात व्यतित केले. दत्तप्रभूंच्या आदेशावरून ते कठोर नैष्ठिक संन्यस्त जीवन जगले.

संन्यासाश्रमाचा आदर्श, मूर्तिमंत वैराग्य, एकांतिक दत्तभक्ती अश्या अनेक वैशिष्ट्यांनी संपन्न असणारे स्वामीजी उत्तम वैद्य, मंत्रसिध्द, मंत्र-तंत्रज्ञ, उत्कृष्ट ज्योतिषी तसेच मराठी व संस्कृत आध्यात्मिक साहित्यातील प्रतिभावान व परतत्त्वस्पर्शी सिध्दकवी, वक्ते सिध्द हठयोगी व उत्कृष्ट दत्तभक्त होते. त्यांनी त्यांचे संपूर्ण जीवन लोककल्याणासाठी तसेच दत्तभक्तीचा प्रचार करण्यात घालविले. महाराष्ट्रापासून हिमालयापर्यंत अनवाणी फिरून त्यांनी वैदिक धर्म व श्रीदत्त संप्रदायाचा प्रचार केला.

श्रीस्वामी महाराजांचे लोकोत्तर व्यक्तिमत्त्व, त्यांचे लोकसंग्रहात्मक ईश्वरी अवतार कार्य व त्यांची दैवी वाङ्मय संपदा ही भारतीय तत्त्वज्ञान, धर्म, संस्कृती यांच्या अभ्यासकांना ध्येयदृष्टी देणारी आहे. महाराज एकपाठी होते. १८५४ ते १९१४ ह्या कालातील जाज्ज्वल्य दत्तावतार म्हणजेच परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराज होत. अखंड वेदाध्ययन, वैयक्तिक साधना तसेच पीडितांना मार्गदर्शनाची जोड यामुळे लहान वयातच ते आध्यात्मिक अनुभवाचे अधिकारी बनले. संत नामदेवांशी ज्याप्रमाणे श्रीविठ्ठल बोलत असे, त्याप्रमाणे भगवान श्रीदत्तात्रेय त्यांच्याशी संवाद साधत असत. त्यांचे संपूर्ण जीवन त्या परमदत्त श्रीदेववाणीच्या प्रकाशातच व्यतीत झाले. एवढेच नव्हे तर त्यांच्या संपर्कात जे जे आले, त्या सर्वांचेच जीवन त्यांनी त्या वाणीसामर्थ्याद्वारे उजळून टाकले.

कोंकणातील माणगाव येथील एका गृहस्थाच्या घरी दुभती गाय होती. त्या दिवशी ती काही केल्या दूध देईना. त्या गृहस्थाला कुणीतरी श्री गणेशभट टेंबे यांच्या मुलाचे म्हणजेच वासुदेवांचे नाव सुचविले. त्यांच्या मंत्राची माहिती असल्याने त्यांनी महाराजांना आमंत्रित केले. त्यानंतर लाथा झाडणारी ती गाय शांत होऊन तिने दूध काढू दिले. अश्या प्रकारचे नानाविध अनुभव लोकांना येत असत. वयाच्या १५ व्या वर्षांपासूनच लोक त्यांना शास्त्रीबुवा म्हणून संबोधू लागले. नरसोबाच्या वाडीला वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांचे स्मृती मंदिर आहे. नरसोबावाडीचे दत्तस्थान हेच त्यांचे प्रेरणास्थान आहे.

परमहंस परिव्राजकाचार्य श्रीमत् वासुदेवानंदसरस्वती स्वामी महाराजांचे जीवनचरित्र अथांग सागराप्रमाणे आहे. ते जेवढे मानवी बुध्दीच्या आवाक्यात येईल तेवढेच प्रकाशात येत असते. त्यांच्या जीवनातील सर्व घटनाप्रसंग ज्ञात होणे अशक्य आहे. प्रकाशित झालेल्या चरित्रावरून त्यांच्या विविध अलौकिक दैवीगुणांचा बोध आपल्याला होतो.

वयाच्या ६० व्या वर्षी म्हणजेच मंगळवार, आषाढ शुक्ल प्रतिपदा शके १८३६, दिनांक २४ जून १९१४ या दिवशी महाराजांनी नर्मदाकिनारी श्रीक्षेत्र गरुडेश्वर मुक्कामी समाधी घेतली. उज्जयिनी, ब्रह्मावर्त, हिमालयातील पहाडी मुलुख (बद्रीकेदार, गंगोत्री), हरिद्वार, पेटलाद, तिलकवाडा, द्वारका, चिखलदरा, मेहतपूर, नरसी, वढवाणी, तंजावर, मुक्त्याला, पवनी, हावनूर, कुरुगड्डी, गरुडेश्वर अश्या ठिकाणी त्यांचे चातुर्मास झालेले आहेत. यावरून त्यांच्या संचाराचे क्षेत्र लक्षात येईल. माणगाव, वाडी, ब्रह्मावर्त, गरुडेश्वर येथे त्यांचा मुक्काम जास्त दिवस होता. त्यांचा सर्व प्रवास दोन छाट्या, दोन लंगोट्या व एक कमंडलू एवढ्याच साहित्याने होत असे. त्यांची वृत्ती नेहमी विरक्तीपूर्ण व शांत असे. अंतःकालापूर्वी काही दिवस ते गरुडेश्वरी राहत होते. त्याच ठिकाणी शके १८३६ आनंदनामक संवत्सरी ज्येष्ठ वद्य अमावास्येस रात्री श्रीदत्तात्रेयांच्या समोर उत्तराभिमुख बसून ते कैवल्यपदास गेले व नंतर देह नर्मदेच्या प्रवाहात सोडून दिला.

श्रीस्वामी महाराजांचा समाधी शताब्दी सोहळा नुकताच भारतात सर्व ठिकाणी साजरा झाला. भारतीय तत्त्वज्ञान व वाङ्मय यामध्ये श्रीस्वामी महाराजांनी मोलाचे योगदान दिलेले आहे. भौतिक प्रगतीबरोबरच शाश्वत चिरंतन मूल्याचा ठेवा आपण प्राणपणाने जपला पाहिजे, असे त्यांचे वाङ्मय सांगते. दत्तोपासनेतील सांप्रदायिक आचार, सकामभक्तीच्या जोडीला त्यांनी ज्ञानभक्तीचे, साक्षात्कार साधनेचे, अद्वैत तत्त्वदृष्टीचे अधिष्ठान स्पष्ट केले. त्यांच्या कार्यामुळे व वाङ्मय संपदेमुळे दत्तभक्तीचा मूळ शुध्द प्रवाह प्रवाहित झाला हे निश्चित! स्वामीजी परोक्षपणे आपल्यात आहेत, म्हणूनच प्रत्येक दत्तभक्तांसाठी गरुडेश्वर हे श्रध्दास्थान आहे.

शुभं भवतु !

## संकष्ट चतुर्थी
चंद्रोदय दि.१७ मार्च

| | | | | | | | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| | | | | बारामती | ०९.१० | रत्नागिरी | ०९.१७ | मार्गाव | ०९.१० | बेंगलोर | ०८.५१ | बिदर | ०८.५७ |
| | | | | सातारा | ०९.१४ | चिपळूण | ०९.१४ | फोंडा | ०९.१० | बेळगाव | ०९.११ | कारवार | ०९.१० |
| | | | | कराड | ०९.१३ | राजापूर | ०९.१३ | पणजी | ०९.१० | बागलकोट | ०९.०३ | हुबळी | ०९.०६ |
| मुंबई | ०९.२० | पनवेल | ०९.१९ | कोल्हापूर | ०९.१३ | दापोली | ०९.१८ | छ.संभाजीनगर | ०९.१२ | गोकाक | ०९.०७ | धारवाड | ०९.०६ |
| ठाणे | ०९.१९ | पालघर | ०९.२१ | सांगली | ०९.०८ | सावंतवाडी | ०९.११ | अहमदनगर | ०९.११ | निपाणी | ०९.११ | म्हैसूर | ०८.५४ |
| कल्याण | ०९.१९ | नाशिक | ०९.१६ | सोलापूर | ०९.०६ | कणकवली | ०९.११ | धाराशिव | ०९.०६ | अथणी | ०९.०८ | हैद्राबाद | ०८.५६ |
| डोंबिवली | ०९.१९ | महाड | ०९.१८ | पंढरपूर | ०९.१० | वेंगुर्ला | ०९.११ | लातूर | ०९.०१ | मुधोळ | ०९.०७ | दिल्ली | ०९.१७ |
| अलिबाग | ०९.१९ | पुणे | ०९.१५ | मंगळवेढा | ०९.१० | म्हापसा | ०९.११ | नागपूर | ०८.५७ | विजयपूर | ०९.०४ | बडोदा | ०९.२३ |

## राशिभविष्य : मार्च २०२५

**मेष** – आर्थिक प्राप्ती चांगली होईल. उत्तरार्धात अनेक मार्गांनी खर्च होईल. कायदेशीर बाबींमुळे अडचणीत याल. जामीन राहू नका. भावंडांशी वाद टाळा. विवाह जुळेल. कर्ज फेडीत रहा. धाडस करू नका. विद्येत अपयश संभवते. चंद्रबल- ९, १५, १६, १७, १८, १९

**वृषभ** – मानसन्मान लाभेल. अनेक मार्गांनी आर्थिक प्राप्ती होत राहील. मित्रांचे गैरसमज होतील. जोखमीची कामे जपून करा. विवाह जुळेल. परदेशगमन तसेच दूरचे प्रवास घडतील. नवीन उपाययोजना कराल. मोठ्या भावास त्रास संभवतो. चंद्रबल- १०, ११, १७, १८, १९

**मिथुन** – सामाजिक कार्यात सहभाग राहील. धंद्यात विचारपूर्वक गुंतवणूक करा. बुध्दिकौशल्य, मुत्सद्दीपणा उपयोगी येईल. परदेशगमनाची संधी लाभेल. मनमानी कराल. उतावळेपणा राहील. कर्माला भाग्याची साथ मिळेल. क्रोध आवरा. चंद्रबल- ८, ९, १२, १३, १४

**कर्क** – आर्थिक लाभ होतील. कायमस्वरूपी नोकरी लागेल. कायदेशीर बाबी सांभाळा. कामात विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. भाग्य बलवान राहील. सामाजिक कार्यात सहभाग राहील. विवाह जुळेल. अहम्पणा राहील. चंद्रबल- १०, ११, १५, १६

**सिंह** – प्रकृतीची काळजी घ्या. कामात विलंब, अडचणी, त्रास अनुभवाल. विपरीत घटनेतून व सामाजिक कार्यातून अचानक धनलाभ संभवतो. गुणवत्ता वाढवा. प्रॉपर्टीची कामे होतील. कौटुंबिक खर्च अनाठायी होईल. क्रोध आवरा. चंद्रबल- ९, १२, १३, १४, १७, १८, १९

**कन्या** – परदेशगमन, प्रवास घडतील. शैक्षणिक प्रगती होईल. विवाह जुळेल. गुरुतुल्य व्यक्ती भेटतील. पूर्वार्धात महत्त्वाची कामे होतील. विसरभोळेपणा जाणवेल. भावनिक वादळे निर्माण होऊ देऊ नका. पूर्वग्रहदूषित रहाल. चंद्रबल- ९, १०, ११, १५, १६

**तूळ** – सर्व बाजूने कुचंबणा होईल. पूर्वार्धात विद्येत अपयश संभवते. उत्तरार्धात यश मिळेल, पण संघर्ष वाढेल. शारीरिक त्रासाकडे दुर्लक्ष करू नका. विपरीत घटनेतून लाभ संभवतो. हट्टी, आग्रही बनाल. विवाह जुळेल. चंद्रबल- १०, ११, १२, १३ १४, १७, १८, १९

**वृश्चिक** – आई-वडिलांना कष्ट होतील. उत्तरार्धात शैक्षणिक बाबीत अधिक लक्ष द्यावे लागेल. कला, बौध्दिक क्षेत्रात प्रगती होईल. महिलांना प्रसूतीसमयी त्रास संभवतो. विवाह जुळेल. आर्थिक प्राप्ती चांगली होईल. कायदेशीर बाबी सांभाळा. चंद्रबल- १२, १३, १४, १५, १६

**धनू** – पूर्वार्धात कामात यश मिळेल. मानसन्मान मिळेल. भावंडांशी वाद टाळा. गृहसौख्य कमी मिळेल. प्रॉपर्टीच्या कामात अडचणी जाणवतील. उत्तरार्धात कौटुंबिक खर्च वाढेल. धंद्याकडे दुर्लक्ष झाल्यास नुकसान संभवते. चंद्रबल- ८, ९, १५, १६, १७, १८, १९

**मकर** – पूर्वार्ध अडचणीचा राहील. आर्थिक प्राप्ती जेमतेम राहील. उत्तरार्धात संघर्षातून यश मिळेल. भावंडांशी वाद टाळा. शैक्षणिक प्रगती होत राहील. विवाह जुळेल. आरोग्यात सुधारणा होईल. सुवर्णालंकारांची खरेदी कराल. चंद्रबल- ९, १०, ११, १७, १८, १९

**कुंभ** – आर्थिक प्राप्तीत अडथळे येतील. आई-वडिलांच्या व स्वतःच्या प्रकृतीची काळजी घ्या. नेत्रविकार जाणवतील. कुटुंबात गैरसमज होतील. इतरांना दुखवू नका. निर्णायक कामात यश मिळेल. कायदेशीर बाबी सांभाळा. चंद्रबल- ११, १२, १३, १४, १५

**मीन** – मानसिक संतुलन राखा. पूर्वार्धात खर्च वाढेल. कायदेशीर बाबींकडे लक्ष द्यावे लागेल. उत्तरार्धात अहम्पणा वाढेल. चेष्टा-मस्करी अंगाशी येईल. गाफील रहाल. पोटाची तक्रार जाणवेल. जवळच्या व्यक्तींचा विरह जाणवेल. चंद्रबल- १२, १३, १४, १५, १६

## पंचांग
(मुंबई वेळेप्रमाणे)

मार्च २०२५ — श्री शालिवाहन शके १९४६-४७ — फाल्गुन-चैत्र — विक्रम संवत् २०८१

| ता. | वार | तिथी | ता.मि. पर्यंत | नक्षत्र | ता.मि. पर्यंत | योग | ता.मि. पर्यंत | करण | ता.मि. पर्यंत | चंद्रराशी | सूर्योदय | सूर्यास्त | भा.सौर दिनांक |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| मार्च | | फाल्गुन | | | | | | | | | | | फाल्गुन |
| ०१ | शनि | शु.द्वितीया | २४.१० | पू.भाद्रपदा | ११.२२ | साध्य | १६.२५ | बालव | १३.४४ | २९.५७ नं.मीन | ०७.०० | १८.४२ | १० |
| ०२ | रवि | शु.तृतीया | २१.०२ | उ.भाद्रपदा | ०८.५९ | शुभ | १२.३९ | तैतिल | १०.३५ | मीन | ०६.५९ | १८.४३ | ११ |
| | | | | रेवती | ३०.३८ | | | | | | | | |
| ०३ | सोम | शु.चतुर्थी | १८.०२ | अश्विनी | २८.२९ | शुक्ल | ०८.५६ | वणिज | ०७.३० | ३०.३८ नं.मेष | ०६.५८ | १८.४३ | १२ |
| | | | | | | ब्रह्मा | २९.२४ | बव | २८.३७ | | | | |
| ०४ | मंगळ | शु.पंचमी | १५.१७ | भरणी | २६.३७ | ऐंद्र | २६.०६ | कौलव | २६.०१ | मेष | ०६.५८ | १८.४३ | १३ |
| ०५ | बुध | शु.षष्ठी | १२.५१ | कृत्तिका | २५.०७ | वैधृति | २३.०६ | गर | २३.४७ | मेष | ०६.५७ | १८.४३ | १४ |
| ०६ | गुरु | शु.सप्तमी | १०.५० | रोहिणी | २४.०५ | विष्कंभ | २०.२८ | विष्टि | २२.०१ | ०८.१२ नं.वृषभ | ०६.५६ | १८.४४ | १५ |
| ०७ | शुक्र | शु.अष्टमी | ०९.१८ | मृग | २३.३१ | प्रीति | १८.१३ | बालव | २०.४३ | वृषभ | ०६.५५ | १८.४४ | १६ |
| ०८ | शनि | शु.नवमी | ०८.१६ | आर्द्रा | २३.२७ | आयुष्मान | १६.२३ | तैतिल | १९.५६ | ११.४४ नं.मिथुन | ०६.५५ | १८.४४ | १७ |
| ०९ | रवि | शु.दशमी | ०७.४५ | पुनर्वसु | २३.५४ | सौभाग्य | १४.५७ | वणिज | १९.४० | मिथुन | ०६.५४ | १८.४५ | १८ |
| १० | सोम | शु.एकादशी | ०७.४४ | पुष्य | २४.५० | शोभन | १३.५५ | बव | १९.५५ | १७.४५ नं.कर्क | ०६.५३ | १८.४५ | १९ |
| ११ | मंगळ | शु.द्वादशी | ०८.१३ | आश्लेषा | २६.१४ | अतिगंड | १३.१६ | कौलव | २०.३९ | कर्क | ०६.५२ | १८.४५ | २० |
| १२ | बुध | शु.त्रयोदशी | ०९.११ | मघा | २८.०५ | सुकर्मा | १२.५९ | गर | २१.५० | २६.१४ नं.सिंह | ०६.५१ | १८.४६ | २१ |
| १३ | गुरु | शु.चतुर्दशी | १०.३५ | पू.फाल्गुनी | ३०.१८ | धृति | १३.०१ | विष्टि | २३.२६ | सिंह | ०६.५१ | १८.४६ | २२ |
| १४ | शुक्र | पौर्णिमा | १२.२३ | उ.फाल्गुनी | अहोरात्र | शूल | १३.२२ | बालव | २५.२५ | सिंह | ०६.५० | १८.४६ | २३ |
| १५ | शनि | कृ.प्रतिपदा | १४.३२ | उ.फाल्गुनी | ०८.५३ | गंड | १३.५९ | तैतिल | २७.४३ | १२.५५ नं.कन्या | ०६.४९ | १८.४६ | २४ |
| १६ | रवि | कृ.द्वितीया | १६.५७ | हस्त | ११.४४ | वृध्दि | १४.४७ | वणिज | ३०.१४ | कन्या | ०६.४८ | १८.४७ | २५ |
| १७ | सोम | कृ.तृतीया | १९.३२ | चित्रा | १४.४६ | ध्रुव | १५.४४ | बव | अहोरात्र | २५.१४ नं.तूळ | ०६.४७ | १८.४७ | २६ |
| १८ | मंगळ | कृ.चतुर्थी | २२.०८ | स्वाती | १७.५० | व्याघात | १६.४२ | बव | ०८.५१ | तूळ | ०६.४७ | १८.४७ | २७ |
| १९ | बुध | कृ.पंचमी | २४.३६ | विशाखा | २०.४९ | हर्षण | १७.३६ | कौलव | ११.२४ | तूळ | ०६.४६ | १८.४७ | २८ |
| २० | गुरु | कृ.षष्ठी | २६.४५ | अनुराधा | २३.३० | वज्र | १८.१८ | गर | १३.४३ | १४.०५ नं.वृश्चिक | ०६.४५ | १८.४८ | २९ |
| २१ | शुक्र | कृ.सप्तमी | २८.२३ | ज्येष्ठा | २५.४५ | सिध्दि | १८.४० | विष्टि | १५.३८ | वृश्चिक | ०६.४४ | १८.४८ | ३० |
| | | | | | | | | | | | | | चैत्र |
| २२ | शनि | कृ.अष्टमी | २९.२३ | मूळ | २७.२२ | व्यतिपात | १८.३५ | बालव | १६.५८ | २५.४५ नं.धनू | ०६.४३ | १८.४८ | १ |
| २३ | रवि | कृ.नवमी | २९.३८ | पूर्वाषाढा | २८.१७ | वरियन | १७.५७ | तैतिल | १७.३६ | धनू | ०६.४२ | १८.४८ | २ |
| २४ | सोम | कृ.दशमी | २९.०५ | उत्तराषाढा | २८.२६ | परिघ | १६.४३ | वणिज | १७.२७ | धनू | ०६.४२ | १८.४९ | ३ |
| २५ | मंगळ | कृ.एकादशी | २७.४५ | श्रवण | २७.४९ | शिव | १४.५२ | बव | १६.३० | १०.२४ नं.मकर | ०६.४१ | १८.४९ | ४ |
| २६ | बुध | कृ.द्वादशी | २५.४२ | धनिष्ठा | २६.२९ | सिध्द | १२.२५ | कौलव | १४.४९ | मकर | ०६.४० | १८.४९ | ५ |
| २७ | गुरु | कृ.त्रयोदशी | २३.०३ | शततारका | २४.३३ | साध्य | ०९.२४ | गर | १२.२७ | १५.१४ नं.कुंभ | ०६.३९ | १८.४९ | ६ |
| | | | | | | शुभ | २९.५६ | | | | | | |
| २८ | शुक्र | कृ.चतुर्दशी | १९.५६ | पू.भाद्रपदा | २२.०९ | शुक्ल | २६.०६ | विष्टि | ०९.३२ | कुंभ | ०६.३८ | १८.४९ | ७ |
| | | | | | | | | चतुष्पाद | ३०.१३ | | | | |
| २९ | शनि | अमावास्या | १६.२८ | उ.भाद्रपदा | १९.२७ | ब्रह्मा | २२.०३ | किंस्तुघ्न | २६.३९ | १६.४८ नं.मीन | ०६.३७ | १८.५० | ८ |
| | | चैत्र | | | | | | | | | | | |
| ३० | रवि | शु.प्रतिपदा | १२.५० | रेवती | १६.३५ | ऐंद्र | १७.५४ | बालव | २३.०० | मीन | ०६.३६ | १८.५० | ९ |
| ३१ | सोम | शु.द्वितीया | ०९.११ | अश्विनी | १३.४५ | वैधृति | १३.४६ | तैतिल | १९.२६ | १६.३५ नं.मेष | ०६.३६ | १८.५० | १० |
| | | शु.तृतीया | २९.४२ | | | | | | | | | | |

दि.१ मार्च रोजी सूर्योदयी : रवि, चंद्र, शनि-कुंभ, मंगळ-मिथुन, बुध, शुक्र, नेपच्यून-मीन, गुरु-वृषभ, हर्षल-मेष, प्लुटो-मकर राशीत राहील. दि.१४ मार्च रवि-मीन, दि.१८ मार्च हर्षल-वृषभ, दि.२९ मार्च शनि-मीन राशीत प्रवेश करील.

फाल्गुन पौर्णिमा प्रारंभ- गुरुवार दि.१३ मार्च सकाळी १०.३५, समाप्ती- शुक्रवार दि.१४ मार्च दुपारी १२.२३

फाल्गुन अमावास्या प्रारंभ- शुक्रवार दि.२८ मार्च रात्री ७.५६, समाप्ती- शनिवार दि.२९ मार्च सायंकाळी ४.२८